॥ श्रीदत्तराज ॥

# माझी---मवळी !

---

## अभंग.

क्षीरसागरांत अससी बैसला । धांवोनि मजला भेटी देई ॥ १ ॥ शेषावरी जरी अससी निजेला । धांवोनि मजला भेटी देई ॥ २ ॥ कैलासी शीव पूजितसे तुजला । धांवोनि मजला भेटी देई ॥ ३ ॥ गहींवरूनी नामा बाहतो विठ्ठला । धांवोनि मजला भेटी देई ॥ ४ ॥

REFBK-0003160
REFBK-0003160

## -पोवाडा.

तारांवर )

मघराज मुळा वषना, धरांणे पांकेना, नाहि कुणि वाली ॥
उगवणार कैसा चारा, वाहतो वारा, वेळ कशी आली ॥१॥
देवाला दया येइना, धनी पोशीना, माय जरी रुसली ।
लेंकरूं ह्मणे आई आई, रडे धाइ धाई, तशी गत झाली॥२॥
कां येइना ऐकूं हाक, पडला कसा धाक, दडी कुठं दिधली ।
गुंतलास कवण्या काजा, विसावा माझा, प्रभु यावेळीं ॥३॥
निर्दया नाहिं तुज दया, वाळली काया, धाव या वेळीं ।
किति करूं तुझी मी खंत, पाहसी अंत, अरे वनमाळी ॥४॥

…, आडवे दैव, करावें काइं ।
…करणी, देवाची काहाणी, सांगाया होई॥५॥
…गे अवदशा, आलि दुर्दशा, निराशा झाली ।
दिसतसे रान, झालों हैराण, काळोखी आली ॥६॥
भाग्याचा उगवे दिस, व्यर्थ ही आस, पाहु कुण्या काळी ।
पावसानें मारिला टाळा, झाला घोटाळा, दिशाभुल झाली॥७॥
शेतकरी जगाचा बाप, पदरिं आलें पाप, पुण्याई सरली ।
जीवाजी पाटिल धनी, पोशिले त्यांनीं, नीतीचा वाली ॥८॥
बैलाच्या जोड्या भारी, गाइ खिल्लारी, गोऱ्हे कांहीं खाली ।
गोकुळीं जशी गजगज, दिसतसे सहज, दृष्ट कां झाली ॥९॥
तिन वर्ष पाउस नाहीं, पेरणी नाहीं, जमिन पड पडली ।
हें कठीण आलें साल, निघाली साल, गुरें रोडवलीं ॥१०॥
कडब्याच्या गंजी चार, संपल्यापार, काळजी आली ।
कणगी ज्या होत्या भरल्या, रिकाम्या झाल्या, स्वारी
गडबडली ॥ ११ ॥
विहिरीला पाणी नाहीं, वैरणहि नाहीं, सुचेना कांहीं ।
डोळ्याला झोंप येइना, मोडु दागिना, काढु तगाई ॥ १२ ॥
जीवाजि सकाळीं उठून, विचार करून, दुकानीं जाई ।
शेडजी होते लेडाशीं, रामराम त्याशीं, बोलला नाहीं ॥१३॥
उसणे द्या रुपये सोळा, नाहींतर बाळा, ध्याहो मोडून ।
मागील बाकि आहे दहा, आतां घे सहा, वही पाहून ॥१४॥
काट्यांत केलें वजन, तोळ्याला उण, व्याज मोजून ।
गयावया येत जीवाजी, अहो शेडजी, वेळ कठीण ॥१५॥

वाळी तुम्ही द्या परत, नाहिं मागत, विकिन दुसऱ्याशी ।
बाकि मी पुढें देइन, वैरणीविण, गुरें उपवासी ॥१६॥
शेडजिनें बाळि ठेविली पेटि दाविली वसूली, केली ।
आतांतर शिल्लक नाहीं, उद्यां तूं येई, बोलि लावीली ॥१७॥
घरि असेल जरी कुळकर्णी, करूं मनधरणी, कल्पना केली ।
त्याची पडली गाठ, जोडिले हात, आसवें आली ॥१८॥
शेडजीची सांगतों कथा, पायावर माथा, करुं मी काइं ।
दावणीस गुरें बांधिलीं, नाहिं सोडिलीं, आलों घाइघाई॥१९॥
तगईचा द्यावा अर्ज, सरकारी कर्ज, रकम जर आली ।
अब्रुही माझि राहिल, गुरें जगतील, धासती सरली ॥२०॥
तगईला द्यावें कारण, जमिन तारण, कायद्याखाली ।
गुराला नाहिं वैरण, खरें कारण, अर्जि पटवली ॥ २१ ॥
आह्मी येउ तुझ्या गावाशी, करूं चौकशी, ह्मणें अधिकारी ।
पोटांत नाहिं भाकरी, येत अंधारी, आला माघारी ॥ २२ ॥

## अभंग.

काय माझा आतां पाहतोसी अंत ।
येइ बा धांवत देवराया ॥ १ ॥
तुजवीण होईल जिवासी आकांत ।
येइ बा धांवत देवराया ॥ २ ॥
असें जरी काम भेटोनीयां जावें ।
धांवोनिया यावें देवराया ॥ ३ ॥
ये रे ये रे देवा नामा तुज बाहात ।
ये ई बा धांवत देवराया ॥ ४ ॥

एकदोन बैल वीकून,कडबा आणून, गुरें जगवीलीं ।
महिन्यांनीं ‑ ाले हुजूर, तगई मंजूर, हुषारी चढली ॥ २३ ॥
मंजूर झाले शंभर, भाव शंभर, हजारीं झाला ।
रुपय हातीं घेऊन, कडबा आणून, चारि बैलाला ॥ २४ ॥
एक महिना कडबा गेला, नाहिं पोटाला, कुणी घालीना ।
भूकेन पोर हैराण, डागिने गहाण, झाला दिनवाण ॥२५॥
दोघे राहाति एकच वेळ, सदा तळमळ, मुकें तरफडती ।
पोराला पोटभर, चार भाकर, पाण्यावर राहती ॥ २६ ॥
पोटाला घातले पिळे, अन्न ना मिळे, एक्या वेळेल ।
बैलाचि करा वीकरी, चारा भाकरी, मुलाबाळाला ॥ २७ ॥
वैरण ही शिल्लक नाहिं, पोटाला नाहीं, कांहिं आपल्याला ।
ऊद्याला नाहीं चंदी, चुलीला बंदी, सांगते त्याला ॥ २८ ॥
दोन वर्ष नाहिं लुगडं, पोर ऊघडें, जाहल्या वाती ।
तुझ सार आहे खर, नाहिं धोतर, आली लंगोटी ॥ २९ ॥
नको ठेवुं गुरांवर डोळा, माझ्या बैलाला, कसहि जगवीन ।
मुलबाळ ठेवा उपवाशि, अन्नाविण त्याशीं, टाका मारून॥३०॥
पाऊस आला दैवान, बैलाविण जाण, पेरणी नाहीं ।
पिकणार धान्य कोठुन, सांग उमजून, कळत कां कांहीं॥३१॥
जोडिचा एक वीकून, धान्य आणून, करूं गुजराण ।
विनविते हात जोडून, वेळ कठीण, आली दैवान ॥ ३२ ॥
बांजारांत बैल बांधला, कसाई आला, तो दाढीवाला ।
रुपयाचि थैली दावीत, कायकिंमत, सांग बैलाला ॥ ३३ ॥

ढळ ढळां रडूं लागला, कंठ दाटला, बैल पाहून ।
बाबोर केलीचाकरी, खाल्ली भाकरी, तुझ्या कष्टान ॥ ३४ ॥
सात जन्मीचा मी वैरी, आलों बाजारीं, तुला घेऊन ।
आजवर दिली सोबत, कठिण वखत, आला काळानं॥३५॥
तूं माझा पाठचा भाऊ, कसा मी देऊं, होउं बैमान ।
मानेवर ठेवुन मान, वाहली आण, गळ्याची त्यान ॥३६॥
नाहिं नाहीं तुला विकत, घेतों शपथ, तुझ्या पायाची ।
चलजाऊं आपल्या घरीं, करूं चाकरी, वेळजायाची ॥ ३७ ॥

## अभंग.

हेचि वेळ देवा नका मागें घेऊं ।
तुह्मांविण जाऊं शरण कोणा ॥ १ ॥
नारायणा यर पाहे विचारून ।
तुजवीण कोण आहे मज ॥ २ ॥
रात्रंदिवस तुज आठवूनि आहे ।
पाहतोसी काय सत्त्व माझें ॥ ३ ॥
तुका ह्मणे किती येऊं काकुळती ।
कांहिं माया चित्ती येऊं द्यावी ॥ ४ ॥

कडे होतें एक हातांत, रुपये आले सात, टाकि मोडून ॥
पोटाचि घेतली चंदी, बैलाला पेंडि, खाऊं घालून ॥ ३८ ॥
पेवाची ज्वारीस्वस्त, घाण ही येत, चव त्याला नाहीं ।
कानपुरचा बग हरभरा, पावटे जरा, भरतिला घेई ॥ ३९॥
नितरोज याचि भाकरी, ती हि नाहिं पुरी, एक्या, वेळेला ।

दुष्काळ नव्हे हा काळ, झाली कमाल, बोले देवाला ॥४०॥
नितरोज सकाळीं उठून, पाला आणून, चारि बैलाला ।
ज्याचा त्याला पाहिजे चारा, बैल म्हातारा, मरूनि गेला॥४१॥
एक बैल फक्त राहिला, तोहि रोगाला, बळी पडला ।
आठ बैलि होति दावण, दिली टाकून, पडे सांदीला ॥४२॥
काळाच्या दाढेंतून, राहिली चुकून, एक गाय दुभती ।
कधीं नाहिं चुलीला बंदी, चालवी चंदा, रतीबावरती ॥४३॥
साथीचा आला फेरा, वेढला सारा, गांव दुखण्यान ।
चहुंकडे पसरली आग, काळाचा राग ग्रासिल त्यान ॥४४॥
नाहिं गांव ठेवलं सुण, दुष्ट काळान तोंड पसरून ।
खोकला ताप संगती, दोघे सोबती, आला घेऊन ॥ ४५ ॥
पोराला आला ताप, झालें बिनताप, डोळे झांकून ।
एक दिडकि नाहिं जवळ, करी तळमळ, औषधाविण ॥४६॥
खेड्यांत कोठचा दवा, धावरे देवा, करी नवस ।
मांडीवर निजला बाळ, धावला काळ, नेलें बाळास ॥ ४७ ॥
लाडक्या अरे वेल्हाळा, तुला कंटाळा, आमचा आला ।
कां रुसलास मजवर, सांग लौकर, बोल चिल्हाळा ॥ ४८ ॥
प्रेमाचा फुटला पान्हा, पाजु मी कुणा, भुकेला तान्हा ।
लाडकी आली तुझी भवली, तिचा तूं गवळी,
गोजिरवाणा ॥ ४९ ॥
आयाडिन ठेवल नांव, देवा तूं धाव, माझ्या धर्माला ।
काळांत सोसले हाल, जिवाचे लाल, दोन गरिबाला ॥५०॥

REFBK-0003160
REFBK-0003160

बाळाला नेऊं नका, माझा लाडका, फोडिली हाक ।
गळ्याचा माझा ताईत, ऊर बडवीत, आईचा शोक ॥ ५१ ॥
चार दिवस गेले नीघून–जात विसरून–शोक बाळाचा ॥
दवामधि लिहिल जस–भोगाव तस–नेम काळाचा ॥ ५२ ॥
शेतामधि गेला सहज–जाहली सांज–वीज चमकत ।
आंबोणीच पाहिलें बेट–उभ आहे नीट–दिसे उगवत ॥५३॥
हें आहे कुणबीशास्त्र--पाऊस त्या रात्र--आला जोरांत ।
आतां काळ मागें हटविला--देव पावला--हर्ष चित्तांत ॥ ५४ ॥
काळिची भरावी ओटी--काळजीमोठी, पडेना चैन ।
काढावे रुपय शंभर--द्यावे नंबर--गहाण लावून ॥ ५५ ॥
घेऊनी घराचा सल्ला–दुकानीं आला--मागणी केली ।
शेटजी देताका रीण–वेळ कठीण–आम्हांला आली ॥५६॥
रुपय द्यांव शंभर–दोन नंबर--गहाण ठेवून ।
दुपटीचा कागद करूं--व्याज दिढी धरूं--कर्ज देईन ॥ ५७ ।
वेळेचा किम्मत भारी--कागदावरी--लिहाव खोटं ।
करूं नका माझ्यावर कावा-दिवाणीदावा-नाहि मी थोटा॥५८ ॥
दोनशाचा कागद केला–रजिष्टर झाला–नोंदला दस्त ।
दोनशे पुढें दाखवले--शंभरच आले--खरें पदरांत ॥ ५९ ॥
मनि उदास बैलाविण, करी भाड्यान, पेरणी सारी ।
पावसान मारली दडी, सदा हडबडो, सुकतसे ज्वारी ॥६०॥
कुळकर्णि आला शेतांत, पीक पाहात, करी आणेवारी ।
जामिनींत आले मुरवण, झालि बुडवण, काळजी भारी ॥६१॥

आणेवारी आणे बारा, वसूली करा, ह्मणे अधिकारी ।
मागील दीड सालाचा, वसुल सक्तीचा, बाकी सरकारी ॥६२॥
हुकुमाचे ताबेदार, वसुल करणार, झालि सुरवात ।
ताकीद कुळाला दिली, दवंडी ऐकली, धास्ति पोटांत ॥६३॥
पाण्याविण मासा जसा, तडफडी तसा, गेलें अवसान ।
कापती पाय थरथरा, झाला घाबरा, भिजे घामान ॥ ६४ ॥
दारामधि आला महार, करी जोहार, भरा पट्टीला ।
पाटील चला चावडी, आताच्या घडी, तगादा केला ॥६५॥
तात्याचे धरिले पाय, करूं मी काय, आली लाचारी ।
खायाला नाहीं अन्न, द्यावि कोठून, पट्टी सरकारी ॥ ६६ ॥
पेरणीच नुसती केली, तुम्ही पाहिली, झालें नापीक ।
आणवारी खोटी केली, आम्हांला भवला, मागतों भीक ॥६७॥
कुळकर्णी आह्मी नांवाचे, कूच कामाचे, जाळितों पोट ।
वाढती होते आणेवारी, पुढें अधिकारी, तान वरीष्ठ ॥ ६८ ॥
आतां दाद मागावी कुठं, सांगाव नीट, ऐकूं जाईल ।
ठाण्यांत जाउनी पहा, अर्ज तुम्ही लिहा, रोष होईल ॥६९॥
दहापांच आले ठाण्याला, अर्ज त्यानिं दिला, खोटी आणवारी
फेकून दिला तो अर्ज, काढुनि कर्ज, बाकि द्या सारी ॥७०॥
फुकट गेली खटपट, गांवची वाट, नीटपण धरली ।
हा देवा व्यर्थ जिण, टाक मारून, काळजी हटली ॥७१॥
२गाई घेतली जरी, गुरु नाहिं घरी, गेली सोडूनी ।
जमीन टाकली गहाण, झाली धुळधाण, झालों दिनवाणी ॥७२॥

मराठी ग्रंथ संग्रहालय

सावकारी शिरली घरीं, तगाइ खरी, देणें सरकारी ।
जवळ नाहीं अवसान, झालें नादान, आली नादारी ॥ ७३॥
जिव झाला कासावीस, आली नोटीस, खालसाची ।
जमीन आतां जाणार, काय करणार, गती दैवाची ॥ ७४ ॥
धांडोरा दिला गांवांत, साऱ्या लोकांत, बातमी झाली ।
लिलावाला या हो कुणी, साऱ्या लोकांनीं, जाहिरात केली ॥७५
धास्तीनें खचलि कंबर, गेले नंबर, काळिमा आली ।
जन्माची झाली माती, कपाळी माती, लावाया नुरली ॥ ७६
वडिलांचें डुबलें नांव, संसाराचि नाव, माझी काशि फुटली ।
काळानें नेली काळी, सदा तळमळी, गोष्ट ही आटली॥ ७७

## अभंग.

**ज्याचे होतें त्यानें नेले । एथें तुझें काय गेलें ॥ १ ॥**
**वेगें होई सावधान । करीं देवाचें चिंतन ॥ २ ॥**
**गती न कळे होणाराची । हे तों इच्छा भगवंताची ॥३**
**पूर्व संचिताचें फळ । होती दुःखाचे कल्लोळ ॥ ४ ॥**
**पूर्वी केलें जें संचित । तें तें भोगावें निश्चित ॥ ५ ॥**
**दास म्हणे पूर्वरेखा । प्राप्त न टळे ब्रह्मादिकां ॥ ६ ॥**

सावकार घाबरा झाला, तगादा केला, जिवाजीला ।
देण्याची करावी सोय, काय उपाय, केला कर्जाला ॥ ७८
बरी तुम्ही साधली संधी, उडाली चांदी, माझ्या जन्माची ॥
आशि कधी येईना वेळ, आता हळहळ, गती कर्माचा ॥७९॥
शेठजीनें केला कावा, दिवाणी दावा, चारशाचा ॥
दस्ताची दाम दुप्पट, केली लटपट, लोभ पैशाचा ॥८०॥

चहुकडून पडला वेढा, झाला बापुडा, मधीं सांपडला ॥
काळाचें आलें काहुर, सुकला नूर, पुरा भांबवला ॥ ८१ ॥
बेलीफ आला गावास, दिली नोटीस, जिवाजीला ।
नक्कल दिली अर्जाची, फेडकर्जाची, धाक जीवाला ॥८२॥
फिर्याद पाहि वाचून, आली त्या कळून, कारवाई ।
आहारे देवा काय, खरा हा न्याय, कलीच्या पाइ ॥८३॥

## अभंग.

**आलें भगवंताच्या मना । तेथें कोणाचे चालेना ॥ १**
**जैसा कलिराजा आला । धर्म अवघाचि बुडाला ॥ २**
**नीति मर्यादा उडाली । भक्ति देवाची चूकली ॥ ३ ॥**
**दास म्हणे पाप झालें । पुण्य अवघेची बुडालें ॥ ४ ॥**

नाहिं कुणी आमचा वाली, म्हणुन का आली, दशा दैवाला।
ही आतां नको जाचणी, टाक मारुनी, आम्हा कुणब्याला॥८४
मेल्यावर सुटला काच, जिवाचा जाच, यमाला धाड ।
नीतीवर आली धाड, आतां तूं काढ, अनुचा चाड ॥८५॥
भाकर कोंड्या भोंड्याची, गर्दि जायाची, घेत पदरांत ।
शेठजीचा मोठा थाट, चालती वाट, आले कोरटांत ॥८६॥।
खटल्याचें आलें कां कुणी, योर पाहुनी, वादि प्रतिवादी॥
बाराचा वाजला घंटा, चालवूं तंटा, पुकारा आधीं ॥८७॥
जन्माला एकदां याव, खरं बोलाव, म्हणे कोरटाला ।
कागदांत लिहिले किती, घेतले हातीं, पहा खात्याला ॥ ८८
जमाखर्चाचा ताळा मेळा, सारा घोटाळा, कागदी मेळ ।
चारशे कसे तुम्हि केले, शंभरच दिले, खरें मुद्दल ॥ ८९

शेडजीचे बगलबच्चे, मिंधे कर्जाचे, पुरावा केला ।
सांपडला तडाख्यांत, अशा खड्यांत, पुरा कुणब्याला ॥ ९०

कोर्टाला करी विनवणी, शपथ बोलूनी, साक्ष घ्यावी ।
लेंकरूं धरावें हाती, आताला नुसती, भाकरी द्यावी ॥ ९१

वाहिना कोणी शपथ, कानावर हात, कुणी बोलेना ।
शेटजीची बोबडी वळली, जीभ वाळली, ओठ हालेना ॥९२

जिवाजीचे धरले पाय, झाला अन्याय, कोर्ट समोर ।
कोर्टाला पटला न्याय, म्हणे अन्याय, दिला रूकार ॥ ९३

धयधया रडे शेटजी, आतां जीवाजी, पुरे कर तंटा ।
समजूत करूं दोघाची, माझ्या अब्रूची, वाजली घंटा ॥ ९४

मी शरण आलों तुला, मारुं नको मला, तार वा मार ।
एकटा गावि जाशील, मला हसतील, कर उपकार ॥ ९५

तुम्ही करतां खोटं नाटं, जाळितां पोट, जात सापाची ।
ज्याचे त्याला नडतें कर्म, तुझा तुला धर्म, भरति पापाची ९६

माझी तुला येऊं दे दया, पडतसे पाया, घेतो शंभर ।
मिटविलें आम्ही आपसांत, अर्ज कोर्टांत, आले बाहेर ॥९७

दोन महिनें गेल्यावर, जिवाजीवर, दिली दरखास्त ।
गांवांत आला बेलिफ, केलि तारीफ, शेडजी जास्त ॥ ९८

तुम्हा बरी केलि खटपट, तुमच्या नरकांत, कसा राहीन ।
कुणब्याचा नाहिं भरवसा, जिवाला फासा, जाहले रीण९९

## अभंग.

**नाहीं पापाचा कंटाळा । येतो हव्यास आगळा ॥ १ ॥**
**जना सुबुद्धि नावडे । मन धांवे पापाकडे ॥ २ ॥**
**राशी रामदास म्हणे । पुण्य ऊणें पापदुणें ॥ ३ ॥**

काळानें आग पाखडली, अवदसा आली, माझ्या घरांत ।
शेटजी करा तयारी, भांडि कुंडी सारीं, करावी जप्त ॥ १००
काढती फास फारोळी, बेडगे कुदळी, खोरी पाहरी ।
कोयते तशा कुऱ्हाडी, हांडे आणिक भांडी, कढली सारी १०१
मोठाल्या धुंगर माळा, आठ बैलाला, झुली नकशीच्या ।
तिपणीचे रंगित चाडे, पितळेचे तोडे, जिनसा हौसेच्या॥ १०२
माल सारा करुनि जप्त। केलि किंमत, भरति होईना ।
दागिनें दिले काढून। डाका मोडून, नांव तिचे सगुणा ॥ १०३
हरिश्चंद्र ताराराणी, किती जाचणी, सोसली त्यांनीं ।
सत्वाला नाही हरले, शेवटी तरले, सत्व राखूनी ॥ १०४
लेकरु गेल माझं रानी। गाय घेऊनी, चारायाला ॥
येईल आता माघारी, नाहि भाकरी, त्याला खायला ॥ १०५
उपवाशि माझं पाडस। गल वनास, मागे हरणीच्या ।
येईल अतां धावत, भूक पोटांत, लागली त्याच्या ॥ १०६
तिघा पुरति ठेवली ज्वारी, तीन भाकारि, झाल्या दूपारी ।
जप्तिला नेतां येईना, असा कायदा, आहे उपकारी ॥ १०७
बाळ आला रानातुन, गाय घेऊन, जेवायाला ।
एक ताटि दोघे बैसले, असे का केले, पुसे आईला ॥ १०८

सकाळी झाला गोंधळ, मनी हळहळ, जाहला वेडा ।
हा खेळ असे कोणाचा, आता दैवाचा, हाकावा गाडा ॥१०९
तोंडांत घास घातला, उमासा आला, सारिले ताट ।
उठून आला बाहेर, कपाळावर, मारिला हात ॥११०
धुळधाण झालि जन्माची, गती कर्माची, झाली कहाणी ।
जाहलों पुरा गोसावी, व्हावें गोसावी, राख फासूनी ॥१११
आतां फक्त राहिली गाय, करू मी काय, पोटासाठी ।
काळजी लागली मोठी, आली नरोटी, घराला काठी ॥११२
जाहला पार उन्हाळा, दूर देशाला, जाव निघून ।
मनांत केला विचार, उद्या बाजार, गाय वीकून ॥११३॥

## अभंग.

**पोट लागलें पाठीशी । हिंडवितें देशोदेशीं ॥ १ ॥**
**पोटा भेणें जिकडे जावें । तिकडे पोट येतें सवें ॥ २ ॥**
**जपतप अनुष्ठान । पोटासाठीं झालीं दीन ॥ ३ ॥**
**पोटें सांडियेलीं चवी । नीचापुढें तें नाचवीं ॥ ४ ॥**
**पोट कसयानें भरे । तुका म्हणे झुरझुरूं मरे ॥ ५ ॥**

नाहीं विकली कधी ही गाय, जगाची माय, बुद्धि कां सुचली।
ऐकला शद्ब आंतून, डोळे भरून, आसवे आलीं ॥११४॥
अन्नाचि तुम्हाला भ्रांत, होतांनीवांत, आजवर ।
सवलिनें दिलें जिवदान, राखिला प्राण, कशावर ॥११५॥
सहा महिने जिनें जगाविलें, खाऊं घातलें, दुधावरती ।
शेवटीं तुम्ही विकणार, बरा उपकार, करा तिजवरती॥११६

तिनें बैल तुम्हाला दिले, कामाला आले, शेतिसाठीं ।
दहि दूध खाऊ घातलें, कसें विसरलें, लागला पाठीं॥ ११७
उपकार शिरावर फार, नाहिं फिटणार, एका जन्मांत ।
उलटला जगाचा न्याय, करा अन्याय, लोटा दुःखांत ॥११८
जिचे बैल येति कामाला, तुमच्या शेतीला, तिला विकतां ।
आऊताचि झाली अडचण, गाय विकून, बैल हो आणतां॥ ११९
जिच्या पोटीं जन्मला बाळ, तिचे कां हाल, घालतां घाला ।
घोडिला बैल का झाला, दिला कामाला, पोटचा गोळा॥ १२०
बैलाची आवड भारी, गाइवर सुरी, तुम्ही धरतां ।
ती नाहि आई बैलांची, बीन कामाची, कंटाळा करतां ॥१२१
देवानें दिली नाहि वाचा, फायदा त्याचा, तुम्ही घेतां ।
आईला छळल्यावर, काय करणार, सांगावें आतां ॥१२२॥
आपल्या घरि भारी दुःख, पुढें तिला सुख, बोलली सगुणा
कसाई सुख देणार, उद्या बाजार, भवाळि नेतांना ॥१२३
जिवाजिला दुःख साहिना, रडूं आवरेना, झाला आकांत ॥
गोकुळीं गुरें राखीलीं, तुझी ही भवळी, रुक्मिणीकांत॥ १२४
मागें आड पुढें वीहिर, अशी फीकीर, आले संकट ।
पापही मला करवेना, पुण्य होईना, कर्मबलवंत ॥१२५॥
निर्धार केला मनीं, गाय घेऊनि, बाजारी जाव ।
नेतांना भवळि हंबरली, सगुणा आली, शिंगाला दाव ॥१२६॥
बाळ जागा आतां होईल, दूध मागील, काय सांगाव ।
भवळिला मारिली मिठी, अरे जगजेठी, हिला जगवाव॥ १२७॥

जिवाजिन ओढिली गाय, चाललिस माय, फोडि किंकाळी ।
डोळे भरून पाहु द्या मला, पुन्हा दृष्टिला,
नाहि ही भवळी ॥ १२८ ॥

चार कोस गेला चालून, गाय घेऊन, बाजारांत !
गुराची झालि दाटण, घेतली त्यान, गाय हातांत ॥ १२९ ॥
जाहला गुरांचा भरणा, कोणि येईना, गिऱ्हाईक ।
थोडिशी वाट पण पाहू, नकोरे आणू, देवा खाटीक ॥ १३०
वाणि उदमी कोणी आला, देइन मी त्याला, गाय आपली ।
चार दिवस दुभतें खाईल, दुवा देईल, माझी ही भवळी १३१

जाईना दैना कुणब्याची, पापपुण्याची, भीती नाही ।
आपल पोट जगवाव, तिला माराव, न्याय होई ॥ १३२ ॥

माराव्या साऱ्या गाई, पोटाच्या पायीं, चिरा माना ।
आऊताला जुपा बाईल, कोठला बैल, करा तनाना ॥ १३३ ॥
इतक्यांत आला दलाल, दाखवी माल, काय किंमत ।
घेईन रुपये मी सतरा, देऊं का पंधरा, ध्याहो पदरांत ॥ १३४
ठरले मग साडसोळा, जिवाचा गोळा, गेलि वेल्हाळा ।
बाबारे नीट सांभाळा, भेटु द्या मला, माझ्या भवळीला ॥ १३५
पोराला ध्याव खायाला, दुकानीं गेला घेतला खाऊ ।
दिवस पार जाईल, उशिर होईल, जलदीनें जाऊं ॥ १३६ ॥
गावचे होते सोबती, वाट न जाती, गाय हंबरली ।
शेवटीं ध्यावी पाहून, असें ह्मणून- स्वारि तिथ गेली ॥ १३७ ॥

शें दोनशें बांधिल्या गाई, मधें कसाई, त्यांत भवळी।
पाहातांच आली चक्कर, आंग थरथर, शुद्ध ही गेली ॥१३८
कसाई आले धावुनी, धावारे कुणी, आणा पाणी।
भवळीचि झाली तरफड, करी धडपड, धनी पाहूनी ॥१३९
सोबती आले धावुनी, घातलें पाणी, त्यानि आणूनी।
सावध बसे उठूनी, घालि लोळणी, गाय पाहूनी ॥१४०॥
कसायाला नाहि विकलीं, इथ कशि आली, माझी भवळी।
दाखवली ज्यानें माळ, तोच दलाल, त्यानें ही विकली॥१४१
अरे अरे पापि, चांडाळा, केला घोटाळा, बरा भवला।
आडून कापला गळा, पापाचा मळा, माझा पिकवीला ॥१४२
गाइच्या गेला जवळ, मनीं तळमळ, जिवाची गडणी।
सोडवा सोडवा कुणी, चालली हरणी, मला सोडूनी ॥१४३॥
हे कसाब कापिती मान, तूझे दुष्मान, प्राण घेतील।
ये आतां एकदा भेट, पूढे मग भेट, स्वर्गि होईल ॥१४४॥
कसाब आला मागून, दिला ढकलून, जिवाजीला।
दुष्मान बोलतो साला, कशाला आला, पून्हा ढकलीला॥१४५
लटलटा कापूं लागला, कांहिं बोलेना, ताप फणफणला।
गावचे होते सोबती, धरूनी हाती, आले गांवाला ॥१४६॥
बाबा तुह्मि माझी भवळी, कशाला नेली, बाजार ला।
एकटे तुह्मी कां आला, दिली कोणाला,
सांगा आह्माला ॥ १४७ ॥

लाडकी किती माझी भवळी, खरा मी गवळी, नांव गोपा
जेवण गोड लागेना, मला करमेना, जाइना वेळ ॥१४८॥
आज दूध नाहीं मी प्यालो, उपाशी बसलो, अन्न जाईना ।
गोपाळ कांहीं जेविना, घरी येइना, ह्मणाली सगुणा ॥१४९॥
टाक हात माझे तोडून, पाय मोडून, हत्यारान ।
कुऱ्हाड घरातिल आण, मानेवर हाण, मग सांगेन ॥१५०॥
ढळढळा रडू लागला, कंप [illegible] गळा, दलालान ।
नको आता विचारू मला, कंठ दाटला, शब्द उमटेन १५१
[illegible] होतें [illegible], [illegible]ला काटी; लागणार ।
आतां रडतां कोणासाठीं, बुद्धिच्यापाठीं, कर्म जाणार ॥१५२
आज आपली भवळी गेली, उद्याला पाळी, आहे आपली ।
आपल्यावर होत रीण, घातल अन्न, आतां ती गेली॥१५३
मी तिची कापली मान, माझा ती प्राण, कशी घेणार ।
येताना हाक मारिली, भवाळे हंबरली, ह्मणे येणार ॥१५४॥
कसायाच्या दावणीला, बांधलें तिला, कुण्या दुष्टान ।
अंगांत नाहीं अवसान, राहिना भान, आलों कष्टान ॥१५५
कसायाच्या दावणीला, बांधिलें तिला, तुह्मी कां विकली ।
दुष्टानि केली हिकमत, दिली किंमत, दलाली झाली ॥१५६
कसायानें माझी नेली, तुह्मि पाहिली, बोलली सगुणा ।
[illegible]माचा हुंदका आला, कंठ मोकळा, शोक आवरेना ॥ १५७
तीघांचा ओरडा झाला, पूर लोटला, आली [illegible]रती ।
समजूत करावी कुणी, एकमेकांनीं, तिघे ओरडती ॥१५८॥

सोसेना आह्माला त्रास, काय वनवास, कपाळाला ।
प'पाला आह्मि जो भ्यात्र, किती गांजाव,
दीन दुबळयाला ॥ १५९ ॥
घरांत ाला अंधार, उठ लौकर, दिवा लाव ।
आतां पुरा लागला दिवा, नकोरे जिवा, आतां सोडीव १६०
बाजारचा आणला खाऊं, थोडासा खाऊं, ऊठ गोपाळा ।
खाऊचा नव्हे तो घांस, गाइचे मांस, नको आह्माला ।१६१
तिघांत कोणी जेविना, गोड लागेना, उपाशीं निजली ।
हुरहुर लागली मना, झोप येईना. दृष्टीला भवळी ॥१६२॥
पाहाटेचा जागा झाला, उठूनी बसला, भवळी दारांत ।
बरोबर एक सोबतीण आली घेऊन, तिला ओढीत ॥१६३॥

## गझल.

ऊठरे ऊठ गोपाळा, दिवस हा वर किती आला ।
गाई आल्या वाड्याला ॥
आल्या दोन वाड्याला, आणली एक सोबतीला ।
ऊठरे बाळ गोपाळा ॥
गोपाळ आला धावत, भवळी आंग चाटीत ।
वासरूं येत धांवत ॥
धांवला गाइचा गवळी, बाबा आलि कशी भवळी ।
आई आज दिपवाळी ॥
दिवाळी कर दोघीला, ओवाळ दोन्हि बहिणीला ।
करुणा आलि देवाला ॥

मराठी ... नोंद नं. ........

देवा आमची चिंता, तुजला खास भगवंता ।
आनंद वाटला चित्ता ॥
चित्तीं हर्ष मावेना, चारा घालिते सगुणा, ।
दारीं आला पाहुणा ॥
पाहुणा नव्हे तो कसाई, पुसतो आल्या कां गाई ।
सगुणा बोलली नाहीं ॥
बोलणें पार खुटवलें, कसाई तिनें ओळखिलें ।
काळीज लक्कची झालें ॥
काळजी लागली मोठी, गाई लपवूं कां पोटीं ।
दादा आला कशासाठीं ॥
कशाला दादानों आला, कसाई म्हणे जिवाजीला ।
सोडा आमच्या गाईला ॥
गाइ ह्या घेतल्या कोणी, बाजारांत दलालांनीं ।
घेतल्या काल कसाबांनीं ॥
कसाबी शिक्का पाठीला, आहे आमच्या गाईला ।
बांधलें दांवें दोघीला ॥
बांधुनी ओढि फरफरा, नेऊं नको मला मारा ।
जिवाचा आमचा आसरा ॥
जिवाच्या लाडक्या गाई, किंमत सांग तूं कांहीं ।
म्हणे तो माहिती नाहीं ।
माहिती झाली लोकांला, आले सर्व वाड्याला ।
कसाई त्यांनिं अडविला ॥
अडविला हात जोडून, मागतो पदर पसरून ।
गाई द्याहो सोडून ॥

सोडू मी या कशा गाई, धनी मी गाइचा नाही ।
चाकरी पोटाच्या पायीं ।
पोटाचा आमचा धंदा, धन्याचा मी असे बंदा ।
पाय ते गाइचे वंदा ॥
गाइला जोडिले हात, आई एकदां भेट ।
उमाळा येत पोटांत ॥
उमाळा दाटला फार, लागली डोळ्याला धार ।
टाकुनी आज जाणार ॥
जाणार मला तू सोडून, कशाला ठेवुं मी प्राण ।
वाहते पायींची आण ।
पाय ते धरित आंवळून, रडते गूण आठवून ।
आम्हाला चारिलें अन्न ॥
चारिले अन्न पोटाला, गुण मी सांगु कोणाला ।
पाजिले दूध बाळाला ॥
बाळा दुध तुझें गेलें, ऐकुनी बाळ घाबरले ।
गाइला माझ्या कां विकलें ॥
विकले माझ्या गाईला, रानीं नेऊं कोणाला ।
सजवूं काय पोळ्याला ।
पोळा सण हौसेचा, आमचा फार मौजेचा ।
साज मी केला गाईचा ॥
साज ते घालु कोणाला, लावुंका आग मी त्याला ।
मिठी मारि भवळीला ॥
मिठी मारली घट्ट, कडकडून घेऊं दे भेट ।
भवळी चटित पाट ॥

दा. क्र. ३९४०

पाठचा मी तुझा भाऊ, गाणं तुझं कुठं गाऊं ।
शेवटी एक दे पाहूं ॥
एक दे पापा शेवटला, लाविलें तोंड तोंडाला ।
सीमा नाहिं प्रेमाला ॥
प्रेमा कांहिं आवरेना, आवरितां रडुहि आवरेना ।
आवरितां गाय सोडिना ॥

गाइची येऊद्या दया, पडतो मी पाया, कसाई दादा ।
भवळिला तुह्मी नेणार, आह्मी येणार, दाव्यान बांधा ॥१६४
दोघांची घाला जोडी, करा तातडी, ह्मणे गोपाळ ।
सोडाव्या गाई कोणी, नाहिं मी धनी, माझे का हाल॥१६५
भरतीच्या गाइ नेतांना, शिक्का देतांना, काल बुजली ।
जोडिची गाय घेऊन, आली उसळून, गाय ही भवळी१६६
गाई मी सोडू कशा, आह्माला आशा, चाकरीची ।
चाकरी करी घोटाळा, दुःख आतां गिळा,
वेळ वैऱ्याची ॥ १६७ ॥
वैऱ्याची तुह्माला वेळ, दैवाचा खेळ, पाहा डोळयान ।
गाइचे कोण दुष्मान, झाला दुस्मान, (बैमान)
कापितां मान ॥ १६८ ॥
गाइचा केला बाजार, आता बेजार, काय होऊन ।
कसाब नव्हे दुस्मान, कापिली मान, तुह्मी हातान ॥१६९॥
ओळख सोडिली कुणी, ध्यान द्या मनीं, गेली अक्कल ।
दक्कल नाहीं पापाची, केली जन्माची, पुरी नक्कल॥१७०॥

ही आतां पुरे बडबड, झालि गडबड, ह्मणे कसाई।
खुंट्याच्या सोडल्या गाई, सांगु मी काई, निघाल्या गाई १७१
भवळी घर सोडिना, पाय उचलिना, घेई मरगळ।
बाळाचि झालि तळमळ, मनीं हळहळ, रडे घळघळ ॥१७२
घळघळा रडूं लागला, घसा उकलिला, खालि पडला।
गहिंवर फार दाटला, अंग धरणिला, हुंदका आला ॥१७३॥
मातींत तोंड घालुन, रडे फुंदून, वेळों वेळां।
आइन बाळ आवरिला, मरु दे मला, ह्मणे आईला ॥१७४॥
आइला मारिली मिठी, गाइला काठी, कसाई मारी।
मारतां गाय वाकली, आरोळी झाली, आभाळीं गेली १७५
आहारे अहा दैवा, असा देखावा, पाहु दृष्टीनें।
दृष्टिच्या होऊं दे खाचा, जाऊ दे वाचा, येरे धावून॥१७६॥
फूलान नाहिं दुखविली, कशी सोसली, बाइ तूं काठी।
बोल ग बोल माझ्याशीं, सोसली कशी, उमाळा पोटीं १७७
शेवटीं करूं दे पूजा, बाई ही पुजा हीच आखेर।
पायावर घाली पाणी, कुंकु लावुनी, चारी भाकर ॥१७८॥
माहेरी होतिस खरी, आतां सासरीं, जाचणीं भारीं।
लाडली लेक चालली, तुला लोटली, यमाच्या दारी ॥१७९॥
लागली गाइच्या पाया, आल्या आया बाया, मनीं हळहळती।
पोटांत कालवा झाला-ओरडा केला-सारे तडफडती ॥१८०॥
गाइला माझ्या बोळवा:कुंकुं कुणि लावा, कपाळाला।
लक्ष्मी माझि चालली, प्रेताची आली, कळा तोंडाला ॥१८१

नको नकोरे देवा जिण, टाक मारुन, मला सोसेना।
जीवाजि आला धावत, झाला आकांत, कोणी अवरेना ॥१८२
वाड्यांत झाली दंगल, केलि धांदल, कसायान।
वासरूं गेला विसरून, गाय घेऊन, जातो जलदीन ॥१८३
वासरूं राहिलें घरी, गाय हंबरी, कसाई मारी।
लेकरूं गेली सोडून, जाइ रस्त्यानं, कोण कैवारी ॥ १८४ ॥
सगुणा गेलि धावत, बाळ दारांत, झाला बेशुद्ध।
तोंडांत घातलें पाणी, वारा घालुनि, केला सावध ॥ १८५ ॥
सगुणाला धीर धरवेना, बायानो आणा, माझ्या गाईला।
धवधवा उर बडवीत, पाठी लागत, पडे धरणीला ॥ १८६ ॥

इसतनधन ॐ (या चालीवर)

चालली हो माय, रडे धाय धाय, पाहतां हो काय।
आणा माझी गाय ॥
सोडविना कोणी, धाव चक्रपाणी, आणा सोडवूनी।
गाईस कोणी ॥
कोणी सोडवीना, शोक आवरेना, वाचवारे माना।
घरीं तिचा तान्हा ॥
तान्हुलें पाडस, टाकुनी वनास, कसा काळ फास।
आला हरणीस ॥
भेटवारे आई, दया करा कांहीं, आडवारे गाई।
चला घाइ घाई ॥
गाइ माग जाई, ओढितो कसाई, थांबतांच गाई।
मारितो कसाई ॥

चारा नाहीं पोटीं, मारूं नको कांहीं, धाव जगजेठी ।
बुडालीरे सृष्टी ॥
बुडालीरे सृष्टि, किती होऊं कष्टीं, पहावेना दृष्टी ।
धांव परमेष्टी ॥
निष्ठूर झालासी, आतां का न येशी, कारे हृषीकेशी ।
अंत काय पहासी ॥
पाहशील अंत, आहे मी जीवंत, कर आतां अंत ।
नव्हेस अनंत ॥
येउदे करूणा, विनवूं मी कोणा, वैकुंठिचा राणा ।
गोकुळिचा कान्हा ॥
गोकुळीच्या गोविंदा, पुरविसी छंदा, सोडलास धंदा ।
आनंदकंदा ॥
पहावेना हाल, उभा माग काळ, रडे अळुमाळ ।
आपटी कपाळ ।
गाई गेल्या दूर, बडवीत उर, धरवेना धीर ।
आपटीत शीर ॥

चाल दुसरी

शीर आपटी धरणी वरती ।
आंग टाकिल धरणीला ॥
धरणी माता जागा देईना ।
अंत नाहि त्या शोकाला ॥ १ ॥
माझ्या गाईला फुटता पान्हा ।
पाजिल कवणा मनमोहना ।

नोंद नं. ... ठाणे

घरीं भुकेला असेल तान्हा ।
काय करूं मी दयाघना ॥ २ ॥
कैकयी भवली आला कपाळी ।
रामचंद्राला वनवास ।
तसा कसाई माग लागला ।
कुठे पाहु मी हरणीस ॥ ३ ॥
सत्वासाठीं चिलिया चिरला ।
सत्वधी( ती चांगुणा ।
राज्य पदावर बाळ बसविला ।
सुरी चुकल का दयाघना ॥ ४ ॥
सवति मत्सरीं ध्रुव बाळाला ।
अढळ पदावर बसवीलें ।
गाईसाठीं ये जगजेठी ।
मन कां निष्ठुर त्वां केलें ॥ ५ ॥
शकुनी मामा माग लागला ।
पांडव झाले वनवासी ।
दुष्ट गांजितां कष्ट सोसिले ।
धावत आला व्रजवासी ॥ ६ ॥
लक्ष्मणाला शक्ति लागतां ।
धावत आले हनुमंत ।
माझ्या गाइचा अंत पाहता ।
कसे राहिला निवांत ॥ ७ ॥
सत्वासाठीं कष्ट सोसले ।
राजा हरिश्चंद्रान ।

तारामतींचे शीर उडवितां ।
कसे घाडिले सुदर्शन ॥ ८ ॥
सति सावित्री अगाध कीर्ती ।
वनांत मरता तिचा पति ।
सत्यवानाचा प्राण आणिला ।
किती येऊं मी काकुळती ॥ ९ ॥
गोरोबाचें बाळ जगविले ।
चिखलामध्यें तुडविलें ।
सुळावरती धड चढवीले ।
कबीर पुत्रा हसवीले ॥ १० ॥
राकोबाचा आवा पेटला ।
मडक्यामध्यें होति पिलें ।
मांजरीची पिले मेरलीं ।
अंतर देवा कळवळले ॥ ११ ॥
गोकुळामाधि गाई चारल्या ।
नंदाचा तू गोपाळ ।
तुझ्या लाडक्या गाई चालल्या ।
कुठें गुंतला घननीळ ॥ १२ ॥

पद

( सबसे राम भजन करलेना ) या चालीवर

कुणी तरि दावा गे बाई, कुणि माझी भवळी
गाय दावा कुणि तरी ॥ ध्रु० ॥
भवळी माझी बांधीत होते, बांधित या जाग्याला, ।
काय पाहु मी त्या जागेला, बांधु की कोणाला॥ १ ॥

आठ बैलाची दावण होती, येथें माझी मोठी ।
गोठा माझा दिसतो मोठा, दुःख साहिना पोटीं॥२॥
भवळीसाठीं रानि जाऊनि, आणित होते चारा ।
उपाशि नेली माझी लाडकी, चारू कोणा चारा॥३॥
या गोठ्यातुन ओढित नेली, वाटत मजला खंती ।
कळा घराला काय राहिली, दुःख दिले मी अंती॥४॥
आशा आतां करूं कशाला, कसें करूं मी बाई ।
पोटामध्यें दुःख ढवळलें, किती रडावे बाई ॥५॥
जरी यमानें नेली असती, घरांत मेली असती ।
केली असती मूठ माती, आतां करूं मी काई ॥६॥
मेली नाही आम्ही मारली, पोटासाठीं चिरली
काळीज माझें चरचर करते, निर्दय झालो बाई॥ ७
मानेवरती सुरी ठेवतां, कसा प्राण होईल ।
देवा आतां तूच पाहारे, शाप मला देईल ॥८॥
देवाद्वारीं जाईल भवळी, गाऱ्हाणे सांगेल ।
कुणि पोशिना देवा आतां, माझे केले हाल ॥९॥
नको जन्म हा आतां गाइचा, नसे कुणी पोशिंदा ।
उपकाराची जाणिव नाहीं, उलटा झाला धंदा ॥१०
कलियायाचे दूत कसाई, दलाल खाटिक तीन ।
माझ्यावरती हल्ला करिती, माझी चिरती मान ॥११
माझ्या गाईचा जाहला आत्मा, ऐकेल मग परमात्मा ।
मृत्युपुरीची झाली दैना, पाप जगीं माइना ॥१२
मागील जन्मीं काय घडविलें, नाही माहित देवा।
फळ भोगतो त्या कर्माचे नकोंचा हा ठेवा ॥ १३

स्वर्गांमध्यें वाडवडील ते, मला काय म्हणतील ।
आमच्या पोटीं आला कशाला, नावानें रडतील १४
मन चिंतीतें वैरि न चिंतीं, असेंच झालें बाई ।
भेटेल काहो गाय आमची, सांगा कोणी बाई ॥१५

सगुणाला धरली हातीं, घराला येती, केली समजूत ।
समजूत कांहीं होईना, घरीं येईना, करी आकांत ॥१८७॥
ओरडे घरीं वासरूं, कसें मी करूं, ह्मणे गोपाळ ।
बाबारे नको तूं रडूं, दिवस हा कडू, उलटला काळ ॥१८८
घर माझ झाल सुण, गाइच्याविण, दिसे भणभण ।
रडतोस माझ्या वासरा, गेलारे आसरा, नेलि काळान ॥१८९
ताडातोड केली आइची, गती कर्माची, कशीहि करणी ।
तुझि आइ नाहीं रुसली, गळामध्यें फसली,
गेलि सोडूनी ॥ १९० ॥

आईग भवानी मेली, बाबान दिली, कसाबाला ।
पापाला झालों धनी, नको जाचणी, निघूनी गेली ॥१९१॥
धांवला मागें गोपाळ, झाला कोल्हाळ, सगुणा जाई ।
गावचे धावती लोक, पाहाती शोक, गाइच्या पायी ॥१९२॥
समजूत घातली कुणी, येईना मनीं, आह्मी वनवासी ।
माइची मान जाणार, मींही मरणार, जातो स्वर्गासी ॥ १९३
घराचें नको दर्शन, खाइना अन्न, आजपासून ।
वासरूं आणांरे कुणा, जाति धावुनी, आले घेऊन ॥१९४॥
तुह्मी दोघे जा माघारी, आपल्या घरीं, नका येऊं ।

जन्माचि बांधली गांठ, सोडिना पाठ, बरोबर जाऊ ॥ १९६
लक्षुमी आमची गेली, अवदसा आली, नशीबाला ।
ही आतां शेवटीं भेट, पुन्हां नाहीं भेट,
राम राम बोला ॥ १

रामराम केला अवघ्याला, साऱ्या लोकाला, जाहो माघारी।
पदरांत नाहिं भाकरी, ऐन दुपारी, निघाली स्वारी ॥१९७॥
वनवासी चौघेजण, जाति रस्त्यान, पाहती लोक ।
सत्वाची झाली माती, बुडाली नीती, काय कौतुक ॥१९८॥
आइग भूक लागली, जीभ वाळली, माझी तान्हेन ।
व्याकूळ झाला तान्हेन, आण कोठून, पाणि तूं आण ॥ १९९
तापली खालची माति, पाय भाजती, जात अनवाणी ।
वासरूं मागें येईना, बाळ चालेना, घेत उचलुनी ॥ २०० ॥
हरिश्चंद्र निघे वनास, बाळ रोहिदास, तारामति राणी ।
चालले हे चौघेजण, झाले हैराण, अन्न ना पाणी ॥२०१॥
पोटांत लागली भूक, मागावी भीक, बाळ राहिना ।
भीक कां आम्हीं मागावी, फळमुळ खावी, जाऊं या राना ॥
पिकलेला होता उंबर, फळें सुंदर, घेती तोडून ।
बाळानें घेतली थोडि, खात घडि घडि, पाणि पाहून ॥२०३
गाईची मान जाणार, मीही मरणार, फळे खाईना ।
स्वर्गांत आधि जाईन, गाय पाहीन, बोलली सगुणा ॥२०४॥
बईस गाई जाती, बातमी होती, कसाईखाना ।
तेथेंच धंदा करूं, शेवटीं मरूं, फळें खाताना ॥ २०५ ॥

एक हत्या आहे शिरीं, करा तयार, पुन्हा दुसरी ।
ही आत्महत्या वाईट, आता व्हा धीट, हरी कैवारी ॥२०

### पद

( 'अरे हरि प्याला ' या चालिवर )

कसाई नेतो, नेतो गाईला, गाईवर काळाचा घाला॥धृ।
घातल्या गाई, गाई गाडीत, चारा कांहीं नाही पोटांत ।
रिकामें पोट, कोनाडा झाला ॥ १ ॥
तान्हेल्या गाई, गाई तळमळती, पाण्यासाठीं साऱ्या तडफडती
कांहीं ओरडती, ओरडता टोला ॥ २ ॥
टोले मारीतो, मारी पाठीत, लोटली कोणी दुःखांत ।
आठवण झाली, आठवी बाळाला ॥ ३ ॥
तीन दिवस, नाहिं चारापाणी, भुकेन जाती वाकुनी ।
उभ्या तटस्थ, तटस्थ जागेवाला ॥ ४ ॥
रिकामी जागा, जागा डब्यांत, डबा भरलेला असे जास्त
जास्त नाहि जागा, जागा बसायाला ॥ ५ ॥
आली मुंबई, मुंबईत गाई, धावले तेथें कसाई ।
कसाईखाना, खाना पाहिला ॥ ६ ॥
गाई बावरल्या, बावरता धरिती, काठ्या पाठीवर बसती
आली का मस्ती, मस्ती तुम्हाला ॥ ७ ॥
मोठी दावण, दावणीस, गाई, सकाळी येतो कसाई ।
सुरी हातांत भयंकर, जणू का यमाचे किंकर
घात करणार, चिरणार गाईला ॥ ८ ॥

कसाई खाना, सुंदर बनवीला, चहुबाजूस बंदि त्याला मधि एक दार।
दार खाली फरशी, ओढित आणिती गाईशी,
गाइचा पाय ठरत नाही, उभी राहिना, शक्ति नाही
हिसका देती, देती शिंगाला ॥ ९ ॥
शिंग हिसकीता, पडते उलथून, कसाई तेथ चौघेजण
येती धाऊन, धावती गाइवर, सुरी ठेवित मानेवर
जीव जाईना, जाइना अंत झाला ॥ १० ॥

भवळीवर आली पाळी, सदा तळमळी, ध्यास बाळाचा।
दारांत नेली ओढून, गेलि बुजून, घोर जीवाचा ॥ २०७॥
कसाइ पुढें जों ओढि, मारली उडी, मनीं घाबरली।
नाकामधि बसली घाण, झाली बेभान, फार बावरली ॥२०८
मारुतिचें जसें उड्डाण, रामाचें ध्यान, गेलें लंकेला।
चारि पाय धरी पोटाशी, उडीच्या सरसी, आली रस्त्याला ॥
धावले कसाई भाइ, पळाले घा , गाय आवरेना।
गाइला वाचवू चला, पळारे पळा, गर्दी मावेना ॥ २१० ॥
भवळिन काढला पळ, पुढें देऊळ, आली धावत।
दिवस रामजन्माचा, थाट भजनाचा, देउळी येत ॥ २११ ॥
दारांत मारली उडी, वीज गडगडी, चमकली आंत।
आभाळ वाजे कडकड, झाली गडबड, साऱ्या लोकांत ॥२१२
लोकांचे दिपले डोळे, हात जोडले, तेज साहीना।
ती होति जन्माची वेळ, देवाचा खेळ, कुणी पाहीना ॥२१३

देवाला घालती माळा, तशा गाईला, फुलें उधळून ।
सखा रामकृष्ण पावला, माझ्या गाइला, दिलें जिवदान ॥२१४
इतक्यांत कसाई आले, ोक मागले, गाइच्या पाठीं ।
कसाई राहिले दारी, गाईचे वैरी, झाली आड काठीं ॥२१५॥
गाईची करुणा आली, कसा वनमाळी, आला धावून । '
कसाब हात जोडती, खुदाची प्रीति, घेति दर्शन ॥ २१६॥
बातमी झालि लोकांत, साऱ्या नगरात, गाइची ोष्ट।
गुलाल फुले उधळून, घेती दर्शन, माय तूं श्रेष्ट ॥२१७॥
पालखी आज काढु या, गाय मिरवुया, तयारी झाली ।
मिरवत चालली गाय, जगाची माय, मंडळी आली ॥२१८॥
वाजती ताशा वाजंत्री, पुढें चालती, चौघडा सनई ।
भजनाचा मोठा थाट, लोक आटोकाट, टाळाची घाई २१९
भजनांत भवळि हंबरली, उभी राहिली, पुढें जाईना ।
सारेच झाले चकित, तिने गर्दींत, पाहिला तान्हा ॥२२०॥
वनवासी चौघेजण, आले चालून, वासरूं हातीं ।
गोपाळ घेति उचलून, उभे राहून, गाइला पाहती ॥२२१॥
आईग आपली भवळी, हाक मारली, येग भवळी ।
जीवाजि जात मागून, वासरूं धरुन, दंडवत घाली ॥ २२२
गर्दि मधि दिसला तान्हा, गाइला पान्हा, फार फुटला ।
वासरूं दिलें सोडून, जात धावून, पीत आईला ॥२२३॥
तीघेजण पडती पाया, हरीची माया, कळेल काय ।
दिवस रामजन्माचा, खरा सोन्याचा, भे ली गाय ॥२२४॥

मिरवीत देउळा आली, आरती केली, आनंदानी ।
सत्वाला नाहीं हरले, आज भेटले, पांच हे प्राणी ॥२२५॥
भेटली माझि वेल्हाळा, भेटु द्या मला, फेडिला पांग ।
वाटे नवल लोकाला, काय घोटाळा, बाइ तूं सांग ॥२२६
सांगु मी कुणाला कथा, जन्माची कथा, झालि सगळी ।
ऐकतां कथा कर्माची, खरी दैवाची, लाडकी भवळी ॥२२७
निरहारी तीघे जण, नाहीं जेवण, चार दिवस ।
प्रसाद घेउं देवाचा, माझ्या गाईचा, सोडूं उपवास ॥ २२८
गोरक्षणी गाय ठेवावी, तिला पोसावी, म्हणाले लोक ।
लोकानी पट्टी केली जमिन सोडवली केलें, कौतुक ॥२२९॥

## उपसंहार.

हा आतां नको संसार, व्यर्थ जोजार, भार देवाला ।
मागतो तुला मी देवा, गाइची सेवा,
घडो आम्हाला ॥ २ ० ॥
पावला प्रभु श्रीराम, सुखाचा धाम, आम्ही शिणवीला ।
सारला मागचा ताप, पुढें संताप, नको जीवाला ॥२३१
येथून पुढें संसार, आम्ही करणार, व्याप देहाला ।
या नको आता यातना, नसे वासना,
कांहिं आम्हाला ॥ २३२ ॥
कोठे ही धंदा करूं, पोट पण भरूं नको उपकार ।
गाईला नाहि त्राता, मला कां देतां, नाहि घेणार॥२३३

धर्माच्या पैशावर, आम्ही जगणार, चैन करणार ।
हे घ्यावें कशाला पाप, जिवाला ताप,
कुठे फिटणार ॥ २३४ ॥
घेतलें द्रव्य जनतेचे, तुम्ही गाईचे, करा रक्षण ।
शिक्षण द्याहो लोकाला, गोर गरिबाला,
करा सुज्ञान ॥ २३५ ॥
आमची तुम्हाला कींव, वांचवा जीव आधीं गाईचा ।
दिवस पाहु सोन्याचा, खरा भाग्याचा
सत्य ही वाचा ॥ २३६ ॥
गाईची केली माती, आलि साडेसाती, साऱ्या देशाला ।
देशांत नाहि संपत्ती, मारती किती,
भिकारी झाला ॥ २३७ ॥
गादीवर मेली गाय, लागली हाय, पेशवेशाही ।
कोणता साधला नफा, झाहली सफा,
मराठेशाही ॥ २३८ ॥
ना देव धर्म ना कांहीं, सत्त्वही नाही कुणाची दैना ।
सोडला आधीं आचार, करा विचार,
कसें उमजेना ॥ २३९ ॥
सोसलें शिवाजी कष्ट, आमची गोष्ट, तुम्ही ऐकावी ।
गोशाळा बांधु सुंदर, राममंदिर, गावीं स्थापावी ॥२४०
तान्हेल्याची जाणा तहान, भुकेल्या अन्न, गाइ रक्षण।
जरि नाहि तुम्हाला स्वार्थ, करा परमार्थ,

दिला देवान ॥ २४१ ॥
घेतले वीस नंबर, राममंदिर, दिले बांधून ।
हे दिले आम्ही भवळीला, तुझ्या गाइला
जाव घेऊन ॥ २४२ ॥
गाइची करावी सेवा, घडावी देवा, म्हणाले सगुणा ।
आपण आहा नीमित्त, नीट द्या चित्त. गोष्ट
द्या ध्याना ॥ २४३ ॥
गोपाळ करिल संसार, शिरावर भार, नसे तुह्माला ।
बांधली असे गोशाळा, गाइचा पाळा,
आम्ही सेवेला ॥ २४४ ॥
तोंडांत सदा श्रीराम, दिला आराम, विसावा माझा ।
प्राणाचा राखला प्राण, दिले जीवदान,
धावला काजा ॥ २४५ ॥
घातली सदा लंगोटी, शुभ्र घोंगडी हुरमुजी केली ।
हातांत जपाची माळ, उभा गोपाळ,
सेवा चालवली ॥ २४६ ॥
गाईची सेवा केली, फळाला आली, जिवाजीला ।
मागतो तुला मी देवा, सुखाचा ठेवा,
देई दासाला ॥ २४७॥
राजा भर्तृहरीची नगरी, भिमेच्या तिरीं: तिथें राहणार
गुरू दत्त माझि माउली, करी सावली,
तुझा 'दिनकर' ॥ २४८॥

प्रा. क्र. ३१६०

REFBK-0003160

प्रिंटर—जयराम बापूजी मालपेकर.
खेतवाडी ९ वी गल्ली मुंबई नं. ४

पब्लीशर श. स. डोळे:—व्यवस्थापक श्रीगोवर्धन संस्था कांदे-वाडी काकडवाडी नाका मुंबई नं. ४